राज्यसेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ परीक्षा दि. १८ ऑगस्ट, २०१८

2018

**Q11**

12676

# भाषा पेपर क्र.-1 / Language Paper - 1

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** | **एकूण गुण : 100**
**Standard : H.S.C.** | **Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** | **कालावधी : 3 तास**
**Nature of Paper : Conventional type** | **Time allowed : 3 hours**

***सूचना*** */ Note :*

(i) *उमेदवाराने **भाग - 1** मराठी व **भाग- 2** इंग्रजीकरिता **स्वतंत्र उत्तरपत्रिका** वापरावी.*
*Candidates should use **two separate answerbooks** for **Part - 1** Marathi and **Part-2** English.*

(ii) ***सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*
***All** questions are **compulsory**.*

(iii) *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

(iv) *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

(v) *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answerbook otherwise he/she will be penalised.*

(vi) *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/ उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If part of answer or subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

(vii) *उमेदवाराने **भाग - 1** मराठी या उत्तरपुस्तिकेत **भाग - 2** इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच **भाग - 2** चे उत्तरपत्रिकेत **भाग - 1** (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer **Part-1** Marathi Question in **Part-2** English answerbook and vice-versa, otherwise it will be overlooked.*

**P.T.O.**

www.govnokri.in

# भाग-1 मराठी ( अनिवार्य ) 50

1. एका विषयावर 400 शब्दांचा निबंध लिहा. 25

(a) मी तुमचा महाराष्ट्र बोलतोय.

**किंवा**

(b) मराठी भाषेची : कथा आणि व्यथा.

2. खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 15

I started my work at NASA at the Langley Research Centre (LRC) in Hampton, Virginia. This is primarily an R & D centre for advanced aerospace technology. One of my most vivid memories of LRC is of a piece of sculpture depicting a charioteer driving two horses, one representing scientific research and the other technological development, metaphorically encapsulating the interconnection between research and development.

From LRC I went to the Goddard Space Flight Centre (GSFC) at Greenbelt, Maryland. This Centre develops and manages most of NASA's earth-orbiting science and applications satellites. It operates NASA's tracking networks for all space missions. Towards the end of my visit, I went to the Wallops Flight Facility at Wallops Island in East Coast, Virginia. This place was the base for NASA's sounding rocket programme. Here, I saw a painting prominently displayed in the reception lobby. It depicted a battle scene with a few rockets flying in the background. A painting with this theme should be the most commonplace thing at a Flight Facility, but the painting caught my eye because the soldiers on the side launching the rockets were not white, but dark-skinned, with the racial features of people found in South Asia. One day, my curiosity got the better of me, drawing me towards the painting. It turned out to be Tipu Sultan's army fighting the British. The painting depicted a fact forgotten in Tipu's own country but commemorated here on the other side of the planet. I was happy to see an Indian glorified by NASA as a hero of warfare rocketry.

www.govnokri.in

**3.** खालील उताऱ्याचे 1/3 शब्दात सारांशलेखन करून उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **10**

अस्पृश्यता-निवारणासाठी मी लोकांपुढें त्या विषयाचें प्रतिपादन करूं लागलों, तेव्हां कांहीं कांहीं चांगले शहाणे लोक मला म्हणत, कीं तुम्ही हें नसतें खेंकटें कशाला उत्पन्न करतां ? ते लोक जर आपण होऊन तक्रार करीत नाहींत, तर त्यांच्या मनांत तुम्ही हें विनाकारण कां भरवून देतां ? या शहाण्या लोकांना जगांत काय चालूं झालें होतें, याची ओळख नव्हती; आणि यांना मराठी वाङ्मयाचेंहि ज्ञान नव्हतें, इतकाच त्यांच्या या धिक्कारयुक्त प्रश्नांचा अर्थ होतो. अस्पृश्य समाजाच्या मनांत आपल्याला होत असलेल्या अन्यायाची जळफळ उत्पन्न झालेली होती; व ही जळफळ ते बोलूनहि दाखवूं लागले होते. परंतु हे पृच्छा करणारे लोक अस्पृश्य समाजापासून इतके दूर होते, कीं त्यांचें तें आक्रंदन यांच्या कानीं पडूं लागलें नव्हतें. तेव्हांपासून आतांपर्यंत इतकीं वर्षे लोटलीं आहेत; व आतां अस्पृश्यांचे पुढारी एवढ्या गर्जना करून बोलत आहेत, कीं 'ते स्वत: कोठें तक्रार करीत आहेत ?' असें म्हणणें आतां कोणालाच शक्य नाहीं. तेव्हां अस्पृश्य लोक आपल्या दु:स्थितीसंबंधानें कांहींच तक्रार करीत नाहींत असें ज्यांना वाटत होतें, त्यांना सहासात शतकांपूर्वींचे याच लोकांचे पूर्वज आपल्या दु:स्थितीचें गाऱ्हाणें प्रगटपणें करीत होते, हें सांगितलें असतें, तर त्यांना तें खरें सुद्धां वाटलें नसतें. परंतु वास्तविक गोष्ट अशी आहे, कीं इतक्या पूर्वीच्या काळीं सुद्धां अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी आपल्या दु:स्थितीचें गाऱ्हाणें प्रत्यक्ष गाइलेलेंच होतें. प्रस्तुतच्या काळीं हें गाऱ्हाणें ते कोणापुढे गातात, आणि कोणत्या पद्धतीनें गातात, आणि इतक्या जुन्या काळीं हेंच गाऱ्हाणें ते कोणापुढे आणि कोणत्या पद्धतीनें गात असत, यांत मात्र बराच फरक आहे.

www.govnokri.in

## Part-2 English (Compulsory) 50

**1.** Write an essay on **one** topic of about 400 words. **25**

(a) An Ideal Teacher.

(b) Corruption - the Biggest Challenge for India.

**2.** Translation of a Marathi passage into English. **15**

चित्रपटांचा प्रसार दिवसेंन्दिवस वाढत चालला आहे. दूरदर्शनवर तर बरेचदा चित्रपटांचेच कार्यक्रम असतात. लोक-त्यातही विद्यार्थी, तरुण - हे आपला अभ्यास, आपली कामे बाजूला ठेवून, देहभान विसरून चित्रपट पाहत बसतात आणि आपल्या आयुष्याचे खूप नुकसान करून घेतात.

सुमारे 90 वर्षापूर्वी चित्रपटाला जन्माला घालणारे दादासाहेब फाळके यांच्या मनात 'मनोरंजन' हा चित्रपटाचा एक उद्देश होताच, पण चित्रपटातून समाजप्रबोधन व्हावे, हा ही त्या चित्रपट जन्मदात्याचा उद्देश होता. त्यामुळे चित्रपटाच्या प्रारंभीच्या काळात पौराणिक व ऐतिहासिक विषयांवरच जास्त चित्रपट निघाले; पण आजचे चित्रपट खरोखरच मनोरंजना बरोबर समाजप्रबोधन करतात का ? आजच्या चित्रपटांचा समाजावर खरोखरच काही परिणाम होत आहे का ?

आज हे सारे प्रश्न खरोखरच चिंतनीय झाले आहेत, या चित्रपटांचा विद्यार्थी वर्गावर अनेकदा वाईट परिणाम झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे पालक चिंताग्रस्त झाले आहेतच; समाजधुरीण ही अस्वस्थ झाले आहेत. चित्रपटांतील रंगीबेरंगी जीवन, श्रमाविना मिळणारी श्रीमंती, ऐश्वर्य, उपभोग या सर्व बाबी विद्यार्थ्यांना आकर्षित करतात. चित्रपटांतून दाखवल्या जाणाऱ्या वागण्या-बोलण्याच्या लकबी, पोषाखाची तऱ्हा, एकूणच जगण्याची शैली तरुणवर्गाकडून चटकन उचलली जाते.

चित्रपटांमुळे समाजाचे काही फायदेही होतात. पहिला फायदा म्हणजे समाजाचे मनोरंजन होते. चित्रपटांच्या क्षेत्रात दरवर्षी अक्षरश: अब्जावधी रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे चित्रपट क्षेत्र व त्याच्या अनुषंगाने इतर क्षेत्रांमध्ये रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होते. चित्रपट हा समाजाचा आरसा आहे. समाजजीवनाच्या अंतरंगाचे दर्शन चित्रपटाद्वारे घडते. या दर्शनाने समाजाच्या विचारशक्तीला परिपक्वता येते. समाज अधिक प्रगल्भ बनू शकतो. एका प्रकारे समाजाला घडवण्याचेच कार्य चित्रपट करतो. चित्रपट हे समाज प्रबोधनाचे फार प्रभावी साधन आहे.

भारतीय चित्रपट जबरदस्त ताकदीने व नव्या उमेदीने समाजाला योग्य दिशेने नेतील अशी आशा वाटते.

www.govnokri.in

3. Precis of the passage in about **1/3** of its original length with a suitable title. **10**

Real history should deal, not with a few individuals here and there, but with the people who make up a nation, who work and by their labour produce the necessaries and luxuries of life, and who in a thousand different ways act and react on each other. Such a history of a man would really be a fascinating story. It would be the story of man's struggle through the ages against Nature and the elements, against wild beasts and the Jungle and, last and most difficult of all, against some of his own kind who have tried to keep him down and to exploit him for their own benefit. It is the story of man's struggle for a living. And because, in order to live certain things like - food and shelter and clothing in cold climates, are necessary, those who have controlled these necessities have lorded it over man. The rulers and the bosses have had authority because they owned or controlled some essentials of livelihood, and their control gave them the power to starve people into submission. And so we see the strange sight of large masses being exploited by the comparatively few; of some who earn without working at all, and of vast numbers who work but earn very little.

- o O o -

www.govnokri.in

www.govnokri.in